# के.सी.सी.ने रोवला आधुनिक शिक्षणक्रांतीचा पाया

## शतक महोत्सवी कौन्सिलची सुवार्ता, आरोग्य, शिक्षण, समाजविकासात भरीव कामगिरी

कोल्हापूर चर्च कौन्सिल, कोल्हापूर

EFFORTS · TOIL · SERVICE

**स्वावलंबी, स्वनियंत्रित, स्वयंप्रसारक, सुवार्ता, मंडळीरोपण, मंडळीपोषण, शिक्षण, आरोग्य, समाजविकास या 'नव'कारावर नाममुद्रा कोरत 'कोल्हापूर चर्च कौन्सिल'ने शताब्दी महोत्सव साजरा केला. शंभर वर्षांत कौन्सिलने आरोग्य, शिक्षण, समाजविकासात भरीव कामगिरी करीत रंजल्यागांजलेल्यांना शिक्षणाची दारे खुली केली. सन १९२४ मध्ये लावलेले संस्थेचे रोपटे आज गगनाला जाऊन भिडले आहे. आधुनिक शिक्षणाची मुहूर्तमेढ के.सी.सी.च्या माध्यमातून रोवली गेली. कौन्सिलसाठी रेव्ह. पी. बी. कांबळेसाहेब यांनी ७० वर्षे अतुलनीय योगदान दिले, तसेच कौन्सिलचे उत्थान घडविण्यात आपले आयुष्य वेचले.**

### कोल्हापूर चर्च कौन्सिलची निर्मिती

चार डिसेंबर १८५२ रोजी रेव्ह. डॉ. रॉयल गोल्ड वायल्डर व त्यांच्या पत्नी एलीज जेन कोल्हापुरात आले आणि सुवार्ताबरोबर डॉ. वायल्डर यांनी शाळेची मुहूर्तमेढ रोवली. डॉ. वायल्डर यांनी मिशनरी म्हणून कार्याला सुरुवात केली. पायी आणि कधीकधी घोड्यावरून प्रवास करून ते २,६२४ खेड्यांपर्यंत पोहोचले. त्या काळात बहुतांश लोकांना लिहिता-वाचता येत नसल्यामुळे लोकांची वाईट अवस्था झाली होती. बौद्धिक क्षमतेत वाढ करण्यासाठी त्यांच्याकडे साधन नव्हते, त्यामुळे प्रगती नव्हती. आर्थिक दुर्बलता होती. शिक्षण नसल्यामुळे शूद्र गुलाम बनले. स्त्रियाही शिक्षणापासून वंचित होत्या. त्यामुळे समाज जागृत करण्यासाठी रेव्ह. डॉ. वायल्डर यांनी सुवार्ता सांगण्याबरोबरच प्राथमिक शिक्षणाला महत्त्व दिले. त्यांनी कोल्हापूर व शेजारील खेड्यापाड्यांमध्ये शाळा सुरू केल्या. त्यांची पत्नी एलीज जेन यांनी महाराजांच्या सहकार्याने राजवाड्यात मुलींची शाळा सुरू केली. अशा रीतीने कोल्हापूरमध्ये मुलींची पहिली शाळा रेव्ह. डॉ. वायल्डर यांनी सुरू केली. या शाळेचे सध्याचे नाव एस्तेर पॅटर हायस्कूल असे आहे. या शाळेत भारतातील पहिल्या महिला डॉक्टर आनंदीबाई जोशी यांनी शिक्षण घेतले.




कोल्हापूर : कोल्हापूर चर्च कौन्सिलचे मुख्य कार्यालय

सकाळ गौरवगाथा



**रेव्ह. पी. बी. कांबळे साहेब**

रेव्ह. डॉ. वायल्डर यांचे सुवार्तेचे काम सुरूच होते. सन १८५३ मध्ये त्यांनी कोल्हापूर शहरात चर्च बांधले. कोल्हापूर आणि शेजारील खेड्यापाड्यांत त्यांनी ख्रिस्ती धर्माचा प्रसार केला. मिशनचे काम वाढू लागले, तशी आर्थिक टंचाई भासू लागली. त्यामुळे रेव्ह. डॉ. वायल्डर हे १८६९ मध्ये अमेरिकेला गेले. अमेरिकन प्रेसबिटेरियन फॉरेन मिशन बोर्डला कोल्हापूर मिशनची जबाबदारी घेण्याची विनंती केली. अमेरिकन प्रेसबिटेरियन मिशनचे पहिले मिशनरी रेव्ह. जी. डब्ल्यू. सायलर १९ डिसेंबर १८७० रोजी कोल्हापूरला दाखल झाले. १८७३ मध्ये रेव्ह. डॉ. वायल्डर यांनी रेव्ह. जी. डब्ल्यू. सायलर, रेव्ह. शिवराम मसोजी, रेव्ह. वसंत ठाकूर यांच्या सहकार्याने 'कोल्हापूर प्रेसबिटेरी'ची स्थापना केली.

भारतामध्ये अनेक देशांच्या मिशनरी संस्था, प्रेसबिटेरियन चर्चेस वेगवेगळ्या भागांत काम करीत होत्या. असे काही प्रेसबिटेरियन चर्चेस १९ डिसेंबर १९२४ रोजी एकत्र येऊन त्यांनी 'दि युनायटेड चर्च ऑफ नॉर्दन इंडिया' (यू.सी.एन.आय.) संस्थेची स्थापना केली. या संस्थेने स्वत:सह भारतातील चर्च कौन्सिल्स व चर्चेसचे धार्मिक कामकाज कसे चालावे, यासाठी आपली घटना तयार केली. याला 'ब्लू बुक' म्हणतात. अशा रीतीने कोल्हापूर प्रेसबिटेरीचे विलीनीकरण यू.सी.एन.आय.मध्ये झाले. तांत्रिकदृष्ट्या कोल्हापूर चर्च कौन्सिलची स्थापना जरी १९ डिसेंबर १९२४ रोजी झाली असे दिसत असले, तरी १८७३ पासून 'कोल्हापूर प्रेसबिटेरी' म्हणजेच आजची 'कोल्हापूर चर्च कौन्सिल ऑफ यू.सी.एन.आय.' कार्यरत आहे.

## 'साहेब' म्हणजे समर्पित सेवक

'के.सी.सी.'च्या उभारणीचा ध्यास साहेबांनी आयुष्यभर जपला. त्यांनी अनेक चर्चेसची दुरुस्ती केली, नवीन चर्चेस बांधली. थिऑलॉजी कॉलेज काढून अनेक पाळक तयार केले. समाजाच्या उन्नतीसाठी प्रयत्न केले. प्रत्येक घटकास प्रगतीची योग्य संधी दिली. समाजासाठीच वेगवेगळे प्रकल्प राबविले. साहेबांनी कोणाकडून काही घेतले नाही, पण समाजाला भरभरून दिले. घरातील सर्व चीजवस्तू, पैसा, पुस्तके, अगदी आपला पाळकीय गाऊनसुद्धा दुसऱ्यास दिला. स्वत:जवळ काहीही ठेवले नाही, पण त्यांना जीवनात काहीही कमी पडले नाही.

## के.सी.सी.चे 'साहेब' : रेव्ह. पी. बी. कांबळे

कोल्हापूर चर्च कौन्सिलने विविध क्षेत्रांत जे अत्युत्तम काम केले, त्यामध्ये रेव्ह. पी. बी. कांबळेसाहेबांनी आपला ठसा उमटविला. के.सी.सी.च्या शंभर वर्षांच्या कालखंडात ७० वर्षे रेव्ह. पी.बी. साहेब संस्थेचे भाग राहिले. चार मे १९७४ पासून ५ मे २००५ पर्यंत ते एक्झिक्युटिव्ह सेक्रेटरीपदी कार्यरत होते. शिवाय, १९५२ ते २०२२ पर्यंत 'के.सी.सी.सी.'मध्ये वेगवेगळ्या सेवा दिल्या. ऑक्टोबर १९६३ मध्ये त्यांची 'पाळक' म्हणून दीक्षा झाली. तेव्हापासून शेवटपर्यंत म्हणजे, मे २०२२ पर्यंत त्यांनी वेगवेगळ्या चर्चेसचे मॉडरेटर म्हणून सेवा दिली. साहेबांनी अनेक शाळा टिकविल्या. इंग्रजी माध्यमातील प्राथमिक, माध्यमिक शाळांची निर्मिती केली. मुला-मुलींसाठी होस्टेल काढली. एस्तरे पॅटन हायस्कूल, के.सी.सी. गर्ल्स होस्टेल, एस्तरे पॅटन इंग्रजी माध्यम प्रायमरी स्कूल, एस्तरे पॅटन माध्यमिक शाळा, आयर्विन ख्रिश्चन हायस्कूल, आयर्विन ख्रिश्चन इंग्रजी माध्यम प्राथमिक शाळा, आयर्विन ख्रिश्चन मराठी माध्यम प्राथमिक शाळा, आयर्विन ख्रिश्चन मुलांचे वसतिगृह (सर्व कोल्हापूर), हॉवर्ड मेमोरियल हायस्कूल, के.सी.सी. प्राथमिक शाळा, के.सी.सी. बॉईज होस्टेल, गर्ल्स होस्टेल (सर्व कोडोली), वेंगुर्ला हायस्कूल, बोरपाडळे हायस्कूल, परशुराम नाईक मास्तर हायस्कूल तेंडोली, के.सी.सी. प्राथमिक शाळा (कोडोली), के.सी.सी. हायस्कूल, मुलांचे वसतिगृह (सर्व सांगली), ग्रामसेवक शाळा, निपाणी, मुलांचे वसतिगृह, सावर्डे (ता. कागल), हालोंडी, तळसंदे, चावरे, मिणचे सावर्डे येथे बालवाड्यांची उभारणी केली. कोल्हापूर, चावरे, सावर्डे बुद्रुक येथे समाज विकास केंद्रे, सर्वांगीण उन्नती भिशी, महाराष्ट्र थिऑलॉजीकल, महाराष्ट्र कॉलेज, कोल्हापूरची स्थापना, कोडोलीत गुड शेफर्ड बायबल कॉलेज, पोर्टेबल बायबल स्कूल, तसेच डिसायपलशीप सर्टिफिकेट प्रोग्राम, दि असोसिएशन फॉर थिऑलॉजीकल एज्युकेशन बाय एक्स्टेंशन हे कोर्स सुरू केले. साहेबांनी अनेकांना करिअरसाठी मार्गदर्शन केले. त्यांच्या मदतीवर आणि मार्गदर्शनाने शिकलेली लाखो मुले-मुली आज देशोदेशी काम करीत आहेत. अनेक जण उच्च पदावर, व्यवसायामध्ये आहेत.

रेव्ह. पी.बी. साहेबांनी उभे केलेले कार्य व समाजास सोबत घेऊन काम करण्याचा त्यांचा स्वभाव पाहून 'साहेब नक्की कोण होते,' असा प्रश्न पडतो, तेव्हा लोकांनीच साहेबांना ६२ सर्वोच्च उपाध्यांनी सुमनांजली वाहिली. 'के.सी.सी.'चा आधारवडपासून देवाचा महानसेवक, विश्वासू सेवक, कोल्हापूरच्या मातीतील मिशनरी म्हणून सन्मानित केले. रेव्ह. पी. बी. कांबळेसाहेबांना त्यांच्या पत्नी सीता, मुलगी अनुग्रहा, मुले मिलिंद आणि महेंद्र यांच्या भक्कम साथीमुळे आणि त्यागामुळे यशाचे टोक गाठणे शक्य झाले.

## 'के.सी.सी.'चे आंतरराष्ट्रीय वलय

जीनिव्हा, स्वित्झर्लंडमधील इंटरनॅशनल रिफॉर्म सेंटरच्या जॉन नॉक्स यांनी लिहिलेल्या 'दि रिफॉर्म फॅमिली वर्ल्डवाईड' या शोध पुस्तिकेत कोल्हापूर चर्च कौन्सिलच्या कार्याचे कौतुक झाले. यासाठी रेव्ह. पी. बी. साहेबांनी १९९९ मध्ये इंटरनॅशनल रिफॉर्म सेंटरशी संपर्क साधला. त्या वेळी साहेबांनी दिलेली माहिती आणि केलेल्या पाठपुराव्यामुळे कोल्हापूर चर्च कौन्सिलची नोंद आंतरराष्ट्रीय पातळीवर झाली.

**कोल्हापूर चर्च कौन्सिल**
के. सी. सी. कंपौंड,
नागाळा पार्क, कोल्हापूर ४१६ ००३



'के.सी.सी.'च्या ध्येयधोरणानुसार जात, धर्म, पंथ न पाहता समाजातील सर्व घटकांसाठी चर्चेसद्वारे सुवार्ता, शिक्षण, हॉस्पिटल्सद्वारे आरोग्य सेवा, सामाजिक प्रकल्पाद्वारे समाजाची उन्नती इत्यादींचा ध्यास घेतला. तो जोपासलाही. समाजाच्या उन्नतीत योगदान दिले. शिक्षण, आरोग्याबरोबर आर्थिक सक्षमेसाठी प्रकल्पांची निर्मिती केली. भविष्यात याच ध्येयाने 'के.सी.सी.' आपले काम करीत राहील.

**- दीनानाथ कदम**
कार्यकारी चिटणीस (के.सी.सी.)

**- ॲड. डी. डी. धनवडे**
अध्यक्ष,
(शिक्षण समिती) (के.सी.सी.)